# 8 भारतातील काँग्रेसपूर्व राष्ट्रवादी संस्था

**भारताच्या विविध प्रांतातील राष्ट्रवादी संघटना**

**बंगाल**
- वंगभाषा प्रकाशिका
- लॅण्ड होल्डर्स असोसिएशन
- ब्रिटीशन इंडियन असोसिएशन
- इंडिया लीग
- इंडियन असोसिएशन
- नॅशनल कॉन्फरस

**मुंबई**
- सार्वजनिक सभा
- बॉम्बे असोसिएशन
- बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन
- मिल हॅण्ड असोसिएशन

**मद्रास**
- मद्रास महाजन सभा
- मद्रास नेटीव्ह असोसिएशन

**लंडन**
- इंडियन सोसायटी
- नॅशनल इंडियन असोसिएशन
- लंडन इंडियन सोसायटी
- इंडियन होमरुल सोसायटी
- ईस्ट इंडिया असोसिएशन

**इतर संघटना**
- गुजरात सभा
- डेक्कन सभा

## बंगाल प्रांतामधील संघटना

**1) वंगभाषा प्रकाशिका :-**
- वंगभाषा प्रकाशिका 1836 - राजा राममोहन रॉय
- सरकारी धोरणावर चर्चा करुन सरकारला विनंतीपत्र पाठवणे.

**2) लॅण्ड होल्डर्स असोसिएशन / जमीदारी असोसिएशन :-**
- **स्थापना** :- 1837
- **संस्थापक** :- द्वारकानाथ टागोर
- **सचिव** :- प्रसन्नकुमार टागोर
- चा संबंध इंग्लंडमध्ये स्थापन झालेल्या ब्रिटीश इंडिया सोसायटीशी होता.
- **उद्देश :-** जमीनदाराच्या हितसंरक्षणासाठी.

**3) बंगाल ब्रिटीश इंडियन असोसिएशन :-**
- **स्थापना** :- 28 ऑक्टोबर, 1851 (कलकत्ता)
- **संस्थापक** :- जॉर्ज थॉम्पसन
- **स्वरुप** :- अखिल भारतीय.
- **सचिव** :- देवेंद्रनाथ टागोर, राधाकांत देव.
- **उद्देश :-** तरुणांना सार्वजनिक शिक्षण देणे.
- यात लॅण्ड होल्डर्स सोसायटीचे विलनिकरण केले.
- 1853 च्या चार्टर ॲक्टवेळी या संस्थेने विनंती करुन काही मागण्या केल्या होत्या. ▪लोकप्रिय कायदेमंडळ असावे.
- निळ विद्रोहाच्या चौकशीसाठी आयोग नेमण्याची शिफारस केली होती.
  - मीठावर कर नको.
- उच्च पदाचे वेतन कमी.
- कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ वेगळे असावे.
- याच संस्थेतून हरिशचंद्र मुखर्जी याने हिंदु पोट्रिअट नावाचे पत्रक सुरु केले. यातूनच डलहौसीवर टिका केली. डलहौसीवर टिका करणारा पहिला भारतीय व्यक्ती होता.

**4) इंडिया लीग :-**
- **स्थापना :-** सप्टेंबर, 1875
- **स्थळ :-** बंगाल
- **संस्थापक :-** शिरीषकुमार घोष (अमृतबाझार)
- **मुखपत्र -** अमृत बाझार पत्रिका
- यात वकील, पत्रकार, जमीनदार, सावकार, इत्यादी लोक होते.
- **उद्देश :-** लोकांना राजकीय शिक्षण देणे / राजकीय हक्क प्राप्त करुन देणे.
- भारताची राजकीय उद्दिष्ट्ये अवघडपणे व निर्भिडपणे घोषीत करणारी पहिली राजकीय संस्था.
- इंग्लिश मन या इंग्रजी वृत्तपत्राच्या मते भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा अविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संस्था.

## 5) इंडियन असोसिएशन :-

- **स्थापना** :- 26 जुलै, 1876
- **स्थळ** :- कलकत्ता (अलबर्ट हॉल)
- **संस्थापक** :- सुरेंद्रनाथ बॅनर्जी
- **सचिव** :- आनंदमोहन बोस
- **उद्देश :-** देशात प्रबळ लोकमत तयार करणे, समाज राजकीय हितसंबंधांना, अशा आकांक्षाच्या जाणीवेद्वारा भिन्न वंशीय व भिन्न जातीय लोकांची एकी घडवून आणने, हिंदू-मुस्लीम ऐक्यावर भर.
- **प्रेरणा :-** इटालीयन देशभक्त जोसेफ मॅझिनी
- या संघटनेची वार्षिक वर्गणी 5 रु. होती.
- अफगान युद्धातील खर्च, विदेशी कपडावरील काढलेला कर, दुष्काळाबाबतचे धोरण इत्यादी सर्व माहिती लोकापर्यंत पोहचविणे.
- स्टॅट्यूटरी ॲक्टसाठी लाल मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यासाठी एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविले.
- याच संस्थेमार्फत 1879 मध्ये **बंगाली** हे वृत्तपत्र सुरु केले.
- भारतात सर्वप्रथम स्थानिक स्वराज्य संस्थेची मागणी करणारी पहिली संघटना.
- रिपनच्या कार्याला पाठिंबा दिला होता. (इलबर्ट बिल अपवाद)
- 1883 मध्ये कलकत्ता येथे पहिली परिषद भरविण्यात आली. एकुण 100 प्रतिनिधी उपस्थित होते.
- डब्ल्यु.एस. ब्लँट हा ब्रिटीश उपस्थित होता.
- या सभेचे दुसरे अधिवेशन 1885 ला झाले.

## 6) नॅशनल कॉन्फरन्स :-

- **स्थापना :-** 1883
- **स्थळ :-** कलकत्ता
- **संस्थापक :-** सुरेंद्रनाथ बॅनर्जी
- **उद्देश :-** सर्व प्रातांतील संस्थाने एकत्र येऊन समान कार्यक्रम राबवावा.
- 1886 मध्ये ही संस्था राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विलीन करण्यात आली.

## मुंबई प्रांतामधील संघटना

### 1) सार्वजनिक सभा (पूना असोसिएशन - 1867) :-

- **स्थापना :-** 2 एप्रिल, 1870
- **स्थळ :-** पुणे
- **संस्थापक :-** सार्वजनिक काका (ग.वा. जोशी - गणेश वासुदेव जोशी/ जी.व्ही. जोशी)
- **सहकार्य :-** न्या. रानडे.
- **उद्देश :-** सनदशीर, राजकीय चळवळीची पायाभरणी करणे.
- पुण्यात पर्वती संस्थानाच्या कारभारात मोठा भ्रष्टाचार - शिक्षा व्हावी - संघटन व्हावे - सरदार व इनामदाराच्या साह्याने ग.वा. जोशी यांनी सार्वजनिक सभेत स्थापना केली.
- सभेचे अध्यक्ष (सातारा जिल्ह्यातील औंध संस्थानचे राजे पंतप्रतिनिधी होते.) भवानराव उर्फ बाळासाहेब श्रीनिवासराव
- पुना असोसिएशन (1867) हीचे नामांतर.

**कार्य -**

- 1874 - जबाबदार राज्य मागितली.
- राणीला मानपत्र दिले.
- 1873 च्या दुष्काळात मदत.
- 1875 - दंग्यात इंग्रजांनी टीका केली.
  (रानडे राजनिष्ठ नाहीत, पुण्याहून धुळे बदली. स्वदेशीचा प्रसार. म. फुले (सार्वजनिक सभा))
- याच संस्थेला पुढे लोकमान्य टिळक व गोखलेंचे नेतृत्व लाभले.
- भारतात सर्वप्रथम स्वदेशीचा प्रसार याच सभेमार्फत करण्यात आला, कारण ग.वा. जोशी स्वत: सुताचे कपडे वापरत होते.
- दुष्काळ निर्मूलन, पुरपरिस्थीती याचा आढावा घेवून भारतीय लोकांना मदत केली. ▪ 3000 रुपये बॉम्बे असोसिएशनला मदत.
- वाई, सातारा, सोलापूर येथे शाखा स्थापन केल्या.
- 1880 - (ग.वा. जोशी) यांच्या मृत्यूनंतर सभेचे सुत्रे सीताराम हरी चिपळूणकर, शिवराज हरी साठे, गोपाळ कृष्ण गोखले यांच्या हाती आले.
- 1897 मध्ये ब्रिटीशांची याची मान्यता रद्द केली.
- 1891 ते 1896 या कालावधीत गोपाळकृष्ण गोखले या संस्थेचे सचिव होते.
- टिळकांच्या वर्चस्वामुळे रानडे या सभेतून बाहेर पडले.
- 1896 - टिळकांच्या हातात गेली.

## 2) बॉम्बे असोसिएशन :-

- **स्थापना :-** 26 ऑगस्ट, 1852
- **स्थळ :-** मुंबई
- **संस्थापक :-** जगन्नाथ शंकरशेठ उर्फ नाना (मुंबईचे शिल्पकार) मुंबईचा अनाभिषिक्त सम्राट (१८०३ ते १८६५ ) (आचार्य अत्रे)
- 1852 - मुंबई पारसी-मुस्लीम दंगल - 18 ऑगस्ट बैठक - इंग्रजांना आमत्रण नाही - कारावास - 26 ऑगस्ट, 1852. - नानाच्या वाड्यात बैठक अध्यक्ष - जगन्नाथ शंकरशेठ.
- **बॉम्बे असोसिएशन पदाधिकारी**
  - **- सन्माननीय अध्यक्ष -** सर जमशेटजी जिजाभाई
  - **- कार्यकारी अध्यक्ष -** जगन्नाथ शंकरसेठ
  - **- उपाध्यक्ष -** बोम्मनजी होरमसजी, खशेटजी जमशेदजी
  - **- सचिव -** भाऊदाजी लाड, विनायकराव जगन्नाथराव.
- **उद्देश :-** कायदेशीर मार्गाने जनतेचे प्रश्न सोडविणे.
- मुंबईतील सुशिक्षित तरुण एकत्र करुन या संघटनेची स्थापना करण्यात आली होती. (पारशी, मुस्लीम, हिंदु, पोर्तुगीज, ख्रिश्चन)
- याच संस्थेच्या धर्तीवर 1852 मध्ये मद्रास येथे मद्रास नेटीव्ह या संस्थेची स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यावरील अन्याय दूर करण्यासाठी
- **सहकार्य :-** दादाभाई नौरोजी

## 3) बॉम्बे प्रेसिडन्सी असोसिएशन :-

- **स्थापना :-** 1885
- **स्थळ :-** मुंबई
- **संस्थापक :-** फिरोजशहा मेहता
- **सहकार्य :-** बद्रुद्दीन तय्यबजी, के.टी. तेलंग (ब्रदर इन लॉ)
- **उद्देश :-** भारतीय लोकांचे प्रश्न ब्रिटीश शासनदरबारी प्रभावीपणे माडणे. ▪ INC च्या पहिल्या अधिवेशनाची संपूर्ण जबाबदारी घेतली.
- अर्ज विनंत्या सभा यातून मागण्या.
- लोकांत राष्ट्रीय जगृती निर्माण करण्यात आली.
- पुण्यात जसे सार्वजनिक सभेने काम केले जसे मुंबईत बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन काम केले.

## 4) मिल हँड असोसिएशन :-

- **स्थापना :-** 1884
- **स्थळ :-** मुंबई
- **संस्थापक :-** नारायण मेघाजी लोखंडे
- **ओळख :-** भारतातील पहिली मजूर संघटना.
- **उद्देश :-** कामगारांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्न सोडविणे.

# मद्रास प्रांतामधील संघटना

## 1) मद्रास महाजन सभा :-

- **स्थापना :-** मे, 1884
- **स्थळ :-** मद्रास
- **संस्थापक :-** सुब्रमण्यम आय्यर, रंगय्या नायडू, सुब्बाराव पंतुल, एम.पी. राघवाचार्य.
- **उद्देश :-** कायदेमंडळाच्या विस्ताराची मागणी करण्यासाठी (भारतीयांना विधिमंडळात प्रवेश)

**पुढील ठराव पास केले -**

- कायदेमंडळाचा विस्तारकरणे.
- भारतीयांना प्रतिनिधीत्व देणे.
- कार्यपालिका व न्याय पालिकांचे कार्य स्वतंत्र करणे.
- मद्रास प्रांतात राजकीय सामाजिक, वैचारिक जागृती निर्माण करण्यात महत्त्वाचे कार्य.

## 2) मद्रास नेटीव्ह असोसिएशन :-

- **स्थापना -** 1852
- **ठिकाण -** चेन्नई
- **संस्थापक -** गझलुलक्ष्मीनरसुचेट्टी
- या संस्थेने 1853 च्या चार्टर ॲक्ट अगोदर ब्रिटीश संसदेला निवेदन दिले होते.

# लंडन प्रांतामधील संघटना

## 1) इंडियन सोसायटी :-

- **स्थापना :-** 1872
- **स्थळ :-** लंडन
- **संस्थापक :-** आनंद मोहन बोस
- **उद्देश :-** इंग्लंडमध्ये राहणाऱ्या भारतीयामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे.